# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आरसीसी/२०१७–१८/92
दिनांक –१७ ऑक्टोबर, २०१७

विषय – अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१७–१८ साठी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जास मुदतवाढीबाबत.

परिपत्रक :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे–१ यांचे क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/मुदतवाढ/२०१७–१८/११७७३ दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रानुसार केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१७–१८ साठी विद्यार्थ्यांनी नवीन मंजुरीसाठी (Fresh) व नूतनीकरणासाठी (Renewal) ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ३१.१०.२०१७ अशी वाढविण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नसल्याच्या सूचना केंद्रशासनाने दिलेल्या आहेत असे कळविले आहे.

याबाबत कळविण्यात येते की, सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठाचे विविध विभागांनी याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या/विद्यापीठ विभागाच्या सूचनाफलकावर ठळक अक्षरात सूचना लिहून, नोटीसद्वारे देण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची हार्ड कॉपी त्यासोबत आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात/विद्यापीठ विभागात त्वरीत सादर करण्यासाठी सूचना महाविद्यालयांनी/विद्यापीठ विभागांनी विद्यार्थ्यांना देण्याबाबत कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल परस्पर संचालनालयास सादर करावा.

(डॉ. दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ.

(डॉ. दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव